हातमाग उद्योगाच्या विकासाअंतर्गत जाहिरात व प्रसिध्दी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र. हातमाग २०११/प्र.क्र.२४७/टेक्स-३,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर, २०११.

प्रस्तावना:-

राज्यामधील हातमाग विणकरांनी उत्पादीत केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवी यादृष्टीने विकास आयुक्त (हातमाग), वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत राष्ट्रीय, राज्य स्तरीय, जिल्हा स्तरीय आणि विशेष हातमाग प्रदर्शनीचे आयोजन करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना असून या योजनेअंतर्गत केंद्र सरकारने मंजूर केलेल्या हातमाग प्रदर्शनीकरीता राज्य शासनाकडून स्वत:च्या हिश्श्याची रक्कम आयोजक संस्थांना उपलब्ध करुन देण्यात येते. हि योजना राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम असलेल्या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर आणि महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., मुंबई यांच्या माध्यमातून राबविण्यात येते. परंतू या योजनेचे स्थायी स्वरुपाचे प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात आलेले नसल्यामुळे सदर प्रशासकीय आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

निर्णय :-

राज्यात केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत मंजूर करण्यात येणा-या विविध प्रदर्शनीसाठी तसेच राज्याबाहेर आयोजित होणा-या राष्ट्रीय हातमाग प्रदर्शनीमध्ये भाग घेण्यासाठी राज्य हिश्श्याच्या अर्थसहाय्याचे आकृतिबंध आणि अंमलबजावणीच्या अटी व शर्थी खालीलप्रमाणे निश्चित करण्यास शासनची मान्यता देण्यात येत आहे.

अ) राज्य हिश्याच्या अर्थसहाय्याचा आकृतीबंध :-

| अ. क्र. | हातमाग प्रदर्शनीचा प्रकार | मंजूर करावयाचे अर्थसहाय्य |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय हातमाग प्रदर्शनी | ३०,००,००० |
| २ | राज्यस्तरीय हातमाग प्रदर्शनी | १,००,००० |
| ३ | जिल्हा स्तरीय हातमाग प्रदर्शनी | १,००,००० |
| ४ | विशेष हातमाग प्रदर्शनी | २,००,००० |

ब) योजना अंमलबजावणीच्या अटी व शर्थी :-

१. या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य फक्त केंद्र सरकारने मंजूर केलेल्या प्रदर्शनीसाठी अनुज्ञेय राहील.

२. सदर अर्थसहाय्याची रक्कम संचालक (वस्त्रोद्योग) यांनी आहरीत करुन महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ यांना दरवर्षी ३१ ऑगस्टपुर्वी वितरित करावी.

३. इतर राज्यामध्ये आयोजित राष्ट्रीय प्रदर्शनीमध्ये भाग घेण्यासाठी देण्यात आलेले अर्थसहाय्य महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ यांनी प्रत्यक्ष अदा केलेल्या स्टॉल भाडे व वाहतूक खर्चाकरीता रु. ५.०० लक्ष या मर्यादेत राहील.

४. अ.क्र.३ येथील खर्चाचा तपशील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ यांनी वित्तिय वर्ष समाप्तीनंतर १५ एप्रिल पूर्वी संचालक (वस्त्रोद्योग) यांना सादर करावा.

२. प्रस्तुत योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक :- व्ही-१

२८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग

११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था,

(०२) (५०) हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सुट व इतर अर्थसहाय्य,

२६, जाहिरात व प्रसिध्दी (२८५१ ०१११)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. हे. वागडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., मुंबई.

प्रादेशीक उपसंचालक, वस्त्रोद्योग, मुंबई / नागपूर / औरंगाबाद / सोलापूर.

महालेखापाल १/२, (लेखापरीक्षा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.

संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी. (मार्फत हातमाग महामंडळ / महाटेक्स)

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

कार्यासन अधिकारी (१७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, (टेक्स-३).

क. रा.
९१३६
८/११/११

## राष्ट्रीय प्रदर्शनीमध्ये फॅशन शो आयोजित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र. हातमाग २०११/प्र.क्र.२४७/टेक्स-३,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- ३ नोव्हेंबर, २०११.

प्रस्तावना:-

हातमाग उद्योगाच्या विकासासंदर्भातील जाहिरात व प्रसिध्दी योजनेअंतर्गत केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या संयुक्त सहकार्याने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर आणि महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., मुंबई यांच्या माध्यमातून राज्यामध्ये विविध प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येते. त्यापैकी राष्ट्रीय प्रदर्शनीमध्ये संपूर्ण देशामधील नामांकीत कारागीर विणकर व त्यांच्या संस्था सहभागी होत असल्यामुळे या प्रदर्शनीना जनतेकडून मोठया प्रमाणावर प्रतिसाद प्राप्त होत असतो. लोकसहभागामध्ये अजून वाढ व्हावी व कौशल्यपूर्ण उत्पादनांचे मार्केटींग व्हावे व त्याव्दारे हातमाग विणकरांच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी याकरिता सर्व राष्ट्रीय प्रदर्शनीमध्ये फॅशन शो / सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. याबाबत सर्वकष विचार करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

निर्णय :-

राज्यामध्ये भरविण्यात येणा-या राष्ट्रीय प्रदर्शनीमध्ये फॅशन शो / सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी याव्दारे, शासनची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रयोजनार्थ प्रती राष्ट्रीय प्रदर्शनी, प्रती फॅशन शो / सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्याकरीता रु. १०.०० लक्ष (.अक्षरी रुपये दहा लक्ष फक्त) हि कमालमर्यादा राहिल.

३. उपरोक्त अर्थसहाय्याची रक्कम संचालक (वस्त्रोद्योग) यांनी आहरीत करुन महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ यांना त्वरेने वितरित करावी. तसेच सदर खर्चाचा तपशील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ यांनी वित्तिय वर्ष समाप्तीनंतर १५ एप्रिल पूर्वी संचालक (वस्त्रोद्योग) यांना सादर करावा.

98/199/99

11/11/11

४.  प्रस्तुत योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक :- व्ही-२

२८५१, ग्रामाद्योग व लघूउद्योग

११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था,

(०२) (५०) हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सुट व इतर अर्थसहाय्य,

२६, जाहिरात व प्रसिध्दी (२८५१ ०३११)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रा. हे. बागडे )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

संचालक, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या., मुंबई.

प्रादेशीक उपसंचालक, वस्त्रोद्योग, मुंबई / नागपूर / औरंगाबाद / सोलापूर.

महालेखापाल १/२, (लेखापरीक्षा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.

संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी. (मार्फत हातमाग महामंडळ / महाटेक्स)

नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

कार्यासन अधिकारी (१७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, (टेक्स-३).